


दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८३ ●मंगळवार,दि.१३ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# त्यांना मतदान करूच नका...
## महापालिका निवडणुकीच्या २ दिवस आधी जरांगे पाटलांचे पत्ते ओपन, थेट भूमिकेमुळे मोठी खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात सध्या महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे, येत्या १५ तारखेला राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी मतदान होणार आहे, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे महापालिका निवडणुकीसाठी आता मनोज जरांगे पाटील यांनी थेट आपली भूमिका जाहीर केली आहे. त्यांनी मराठा समाजातील बांधवांना मोठं आवाहन केलं आहे. ते बुलढाण्यात बोलत होते. जे समाजाच्या विरोधात गेले होते, जे आरक्षणाच्या विरोधात गेले, नेमके तेच आता निवडणुकीत उभे आहेत. त्यांना मतदान करू नका, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मराठ्यांनी आता कट्टर आणि कडवट वागलं पाहिजे . मुस्लिम दलितांची या सरकारने काडी लावून टाकली. या सरकारचा कार्यक्रम करा. इतकी खुन्नस ठेवायची की यांना मतदान करायचं नाही. आम्ही कसं लोकसभेला एवढा फेस काढला होता. निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप होत नाही, तर यांनी पैसे वाटलेच आहेत. खूप माल आहे यांच्याकडे. यांच्याकडे आधी काय होतं? आता खूप पैशांचे बंडलं आहेत वाटतं. शर्टामधून दिसतील असे बंडल हे सोबत ठेवतात. नोटा वाटतात आणि घोळ करतात. या महापालिकेत कोणासोबत कोणाची युती हेच कळत नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

यांचं राष्ट्रवादीसोबत जमतं, भाजप शिवसेनेसोबत जमतं, काँग्रेससोबतही युती आहे. हे सर्व भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी शिवसेना सगळे एकत्र ▶उर्वरित पान २ वर

## डिजिटल शिक्षणाचा गाजावाजा करणाऱ्या जि. प. ला...
# पारधी वस्तीवरील शाळेत साधा फळाही नाही याची लाज वाटत नाही का ?

**बीड । प्रतिनिधी**

एकीकडे शासन व प्रशासन डिजिटल शिक्षण या नावाखाली टॅबद्वारे मनोरंजनात्मक शिक्षण देत असल्याचा गाजावाजा करत कोट्यवधी रुपयांचा खर्च करत आहे. मात्र दुसरीकडे बीड तालुक्यातील बोरखेड ग्रामपंचायत अंतर्गत लोणी फाटा येथील पारधी वस्तीवरील जिल्हा परिषद शाळेचे भयाण वास्तव समोर आले आहे. या शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्यांना शिकण्यासाठी साधा फळाही उपलब्ध नाही. भिंतीवर खडूने मुळाक्षरे लिहून शिक्षण दिले



जात आहे. मुलांना बसण्यासाठी बाक नाहीत, फरशी नाही; खडी, माती आणि धुळीने भरलेल्या जमिनीवर शेतीमालाचे फाटके चवाळे अंथरून बसण्याची वेळ या मुलांवर आली आहे. पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छतागृह यांसारख्या मुलभूत सुविधांचा पूर्ण अभाव असताना डिजिटल शिक्षण हा शब्द तरी ▶ उर्वरित पान २ वर

**शाळेला भेट देणारे अधिकारी आम्हाला सतत विचारतात, तुमची मुलं शाळेत का येत नाहीत? पण आमच्या मुलांना शिकण्यासाठी फळा नाही, बसायला बाक नाही, खेळणी नाहीत, पिण्याचे पाणी नाही. अशा परिस्थितीत आमची मुलं शाळेत कशी येणार? शासनाने आमच्या शालेय मुलांसाठी तत्काळ मुलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष रेखा पवार यांनी केली.**

# जिल्हा परिषद निवडणुका संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषद निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत .त्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात होणार आहे. राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका प्रलंबित आहेत. यापैकी २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असल्याने निवडणुका दोन टप्प्यांत घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यापूर्वी सर्वोच्च



न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र आता त्यात सुधारणा करत १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. आरक्षणासंदर्भातील अडचणींमुळे निवडणुका रखडल्या होत्या. मात्र न्यायालयाच्या या निर्णयानंतर राज्य निवडणूक आयोगाला निवडणूक प्रक्रिया वेगाने राबवावी लागणार आहे.

ज्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रलंबित आहेत त्या पुढीलप्रमाणे: अहिल्यानगर, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, धाराशिव, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच राज्यातील ग्रामीण राजकारण तापण्याची शक्यता आहे.

# कायद्याची घडी बसवल्याचा एसपींनी ढोल वाजवला; गोसावीं च्या कारकिर्दीत पोलिसांचा 'नेक' नुरच हरपला




### सव्वा महिन्यापूर्वी गायब झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध लागेना

**नेकनूर । प्रतिनिधी**

एकीकडे कायदा व्यवस्थेची घडी बसवल्याचा ढोल एस पी कडून वाजवला जात असताना दुसरीकडे मात्र गोसावींनी पोलिसांचा नेक नूर कसा बदलला आहे याची प्रकरण बाहेर येऊ लागली आहेत. गेल्या सव्वा महिन्यापासून बेपत्ता असलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध मात्र नेकनूर पोलिसांना लागत नसल्याने नेमका शोधच लागत नाही,की पोलिसांना शोधच लावायचा नाही.असा प्रश्न मुलीचे आई-वडील व नातेवाईकांमधून विचारला ▶ उर्वरित पान २ वर

## नक्कल करता करता काकांच्या पक्षाची अवस्था;
# आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्र्यांचे प्रत्युत्तर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात १५ तारखेला महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान पार पडणार आहे. तर १६ तारखेला निकाल जाहीर होणार आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे. मुंबई महानगरपालिकेकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. कारण, भाजप-शिंदेंची शिवसेना आणि ठाकरे बंधूंमध्ये थेट लढत होत आहे. रविवारी (११ जानेवारी) मुंबईतील दादरमध्ये



असलेल्या शिवाजी पार्क येथे ठाकरे बंधू सभा घेतली होती. त्यानंतर सोमवारी (१२ जानेवारी) मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदेंनी सभा घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर हल्लाबोल केला. मराठी माणसाला उद्योजक बनवणे हे आमचे स्वप्न असल्याचेही ते यावेळी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंच्या लाव रे तो व्हिडीओला त्यांच्याच पद्धतीतप्रत्युत्तर▶उर्वरितपान२वर

## संयमाने वाहन चालविणे हीच खरी हिरोगिरी- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दि.१२(जिमाका)- स्टेअरिंग ही डेअरिंग करण्याची जागा नव्हे. वाहन चालविणे ही जबाबदारी आहे. त्यासाठी रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य असून नियम पालन करुन संयमाने वाहन चालविण्यातच खरी हिरोगिरी आहे,अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी तरुणांना मार्गदर्शन केले. रस्ता सुरक्षा अभियानाचा प्रारंभ एम.जी.एम. विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आज करण्यात आला. युवा दिनानिमित्त सिटी युथ आयकॉन ▶ उर्वरित पान २ वर

# गोदाकाठचा वाघ घडीच्या प्रचारासाठी पुण्यात; आ.विजयसिंह पंडित पुण्यात सभा गाजवू लागले

## सभांना प्रचंड गर्दी -थेट मतदारांशी साधला संवाद

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिका निवडणूकीत सत्ता काबीज करत इतिहास रचणारे आ.विजयसिंह पंडित आता घडीच्या प्रचारासाठी थेट पुण्यात सभा गाजवू लागले आहेत. त्यांच्या सभांना प्रचंड गर्दी होऊ लागली असून थेट मतदारांशी संवाद साधत



आ.विजयसिंह पंडित पुणे महानगर पालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या विजयासाठी जिवाचे रान करू लागले आहेत. ज्या पध्दतीने गोदाकाठचा वाघ म्हणून आ.विजयसिंह पंडितांनी बीडमधील विरोधकांविरूध्द दंड थोपटले, तोच गोदाकाठचा वाघ आज पुणे महानगर पालिका निवडणूक प्रचाराच्या आखाड्यात उतरला आहे. पुणे महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक२०२६ च्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रभाग क्र.९ चे अधिकृत उमेदवार अ-गायत्री मेढे-कोकाटे, ▶ उर्वरित पान २ वर







*दैनिक मराठवाड पत्र २०२६ च्या दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करतांना श्री मां. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड , श्री अशोक कदम सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (प्रशासन), बीड , श्री ऋषिकेश कातळे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, धारूर, परळी , श्री.श्याम जाधव सहकार अधिकारी श्रेणी -२ कार्यालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड. दैनिक मराठवाड पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे. आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

# धनंजय मुंडे लवकरच मंत्रिमंडळात दिसतील; प्रफुल्ल पटेल यांचे संकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे त्यांच्यावर झालेल्या आरोपांच्या नंतर मागील एक वर्षापासून सरकारच्या बाहेर असून, लवकरच ते मंत्रिमंडळात पुनरागम करतील असे सूतोवाच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी केले आहेत.

एका प्रसिद्ध राष्ट्रीय वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत



प्रफुल्ल पटेल यांनी धनंजय मुंडे यांना सहन कराव्या लागलेल्या मनस्ताप व त्रासाबद्दल देखील वक्तव्य केले आहे. बीड जिल्ह्यात तत्कालीन निर्माण झालेल्या परिस्थिती मध्ये जनभावनेचा विचार करून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला गेला होता. त्या प्रकरणात चौकशी देखील पूर्ण झाली असून यामध्ये कुठेही धनंजय मुंडे यांचे नाव नाही, त्यांच्यावर कुठलाही आरोप नाही, तसेच कुठेही त्यांचा संबंध आढळून आलेला ▶ उर्वरित पान २ वर



# संक्रांत : सूर्याचे उत्तरायण आणि भारतीय जीवनाचा उजळता प्रवास

सृष्टीच्या नकाशावर सूर्य हा केवळ एक तेजस्वी ग्रह नाही , तर तो जीवनाचा प्राण आहे . सूर्य उगवतो , म्हणून अन्न पिकते . सूर्य तळपतो , म्हणून पृथ्वी श्वास घेते . सूर्य चालतो , म्हणून काळ पुढे सरकतो . याच सूर्याच्या एका महत्त्वाच्या वळणाला भारतीय परंपरेत संक्रांत असे म्हटले जाते . संक्रांत म्हणजे बदल . संक्रांत म्हणजे संक्रमण . संक्रांत म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे , थंडीच्या कुशीतून ऊर्जेकडे , आणि जडत्वातून चैतन्याकडे जाणारा प्रवास आहे .

संक्रांत हा शब्द संस्कृतातील संक्रमण या धातूपासून निर्माण झाला आहे . सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो , त्या क्षणाला संक्रांत म्हणतात . मकर संक्रांतीच्या दिवशी सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो आणि यालाच सूर्याचे उत्तरायण सुरू होते असे मानले जाते . उत्तरायण म्हणजे सूर्याचा दक्षिणेकडून उत्तरेकडे होणारा भासमान प्रवास . हा प्रवास सहा महिने चालतो . त्यानंतर दक्षिणायन सुरू होते . खगोलशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर पृथ्वी स्वतःभोवती फिरत असताना आणि सूर्याभोवती परिभ्रमण करत असताना तिच्या अक्षाचा कल ऋतू बदलांना कारणीभूत ठरतो . या वैज्ञानिक सत्यालाच भारतीय ऋषींनी धार्मिक , सांस्कृतिक आणि सामाजिक चौकट दिली आहे .


भारत हा भौगोलिकदृष्ट्या विषुववृत्ताच्या उत्तरेला

असलेला देश आहे . त्यामुळे येथे सूर्यकिरणांचा कोन ऋतुनुसार बदलत जातो . उत्तरायणाच्या काळात सूर्यकिरण अधिक थेट पडू लागतात . थंडी हळूहळू कमी होते . दिवस मोठे होतात . रात्री लहान होतात . हा बदल सर्वाधिक जाणवतो तो शेतकऱ्याला . शेतीची जमीन उन्हाच्या ऊर्जेने तापू लागते . रब्बी पिके बहरात येतात . म्हणूनच संक्रांत हा सण केवळ धार्मिक न राहता भौगोलिक आणि कृषी जीवनाशी घट्ट जोडलेला सण ठरतो. भारतीय इतिहासात संक्रांतीला विशेष स्थान आहे . महाभारतात भीष्म पितामहांनी उत्तरायण येईपर्यंत इच्छामरणाचा योग रोखून धरल्याचा उल्लेख आढळतो . उत्तरायणाला देवांचा दिवस मानले जाते , तर दक्षिणायनाला पितरांची रात्र असे संबोधले जाते . यामागे मृत्यूची भीती नसून जीवनचक्राची जाणीव आहे . जन्म , जीवन , मृत्यू आणि पुनर्निर्मिती यांचे अखंड चक्र भारतीय चिंतनात केंद्रस्थानी राहिले आहे . इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर संक्रांत ही आशेची , नवचैतन्याची आणि सकारात्मकतेची खूण ठरली आहे .

संक्रांत म्हणजे केवळ एक तारीख नाही . तो एक उत्सव आहे . तो एक भाव आहे . महाराष्ट्रात संक्रांत म्हणजे तीळ आणि गूळ . तिळगुळ घ्या , गोड गोड बोला हा संदेश केवळ शुभेच्छा नसून सामाजिक तत्त्वज्ञान आहे . कटुता सोडा . गोडवा स्वीकारा . मतभेद विसरा . संवाद जपा . या एका वाक्यात भारतीय संस्कृतीचा आत्मा सामावलेला आहे . या दिवशी हळदीकुंकू , देवपूजा , नव्या वाणाच्या धान्याचे अर्पण आणि आकाशात झेपावणारे रंगीबेरंगी पतंग , हे सारे दृश्य भारतीय संस्कृतीची समृद्धी दाखवते . पतंग जशी दोरीवर अवलंबून असते , तसाच माणूस संस्कारांवर अवलंबून असतो , हा मूक संदेश संक्रांत देऊन जाते .

भारत हा विविधतेत एकता जपणारा देश आहे आणि संक्रांत हा त्याचा प्रत्यय देणारा सण आहे . पंजाबमध्ये लोहडी , गुजरातमध्ये उत्तरायण पतंग महोत्सव , तामिळनाडूमध्ये पोंगल , आसाममध्ये माघ बिहू , तर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात संक्रांती या नावाने हा सण साजरा होतो . नावे वेगळी , परंपरा वेगळ्या , पण भावना एकच आहे – सूर्याचे स्वागत आणि नव्या ऊर्जेचे अभिनंदन .

लोकजीवनात संक्रांतीचा उत्सव कविता , चारोळी आणि म्हणींमधूनही व्यक्त होतो .

सूर्य निघतो सोन्याचा , अंधार होतो दूर .  
नव्या आशेच्या वाटा , उघडतो जीवनपूर .  
तिळात गूळ मिसळला , गोड झाला संवाद .  
सूर्याने शिकवले , जीवनात बदलाचा वाद .  
सूर्य उगवला की दिवस चालतो , काळ बदलतो , पण संस्कार टिकतात , गोड बोलणे हीच खरी पूजा – या म्हणींमध्ये संक्रांतीचा आत्मा दडलेला आहे .

संक्रांत हा सण सामाजिक एकात्मतेचा मजबूत धागा आहे . जात , धर्म , भाषा यांच्या सीमा ओलांडून माणसं एकमेकांशी जोडली जातात . गूळ , तीळ , ऊस , भुईमूग यांची देवाणघेवाण ही केवळ अन्नाची नसून आपुलकीची असते . आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगातही संक्रांत माणसाला माणसाशी जोडण्याचे कार्य करते . पर्यावरणपूरक सण , सेंद्रिय उत्पादनांचा वापर , आणि परंपरेचे जतन , यामुळे संक्रांत आधुनिक काळाशी सुसंगत ठरते . संक्रांत आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते . बदल अटळ आहे , पण बदल गोड असू शकतो . जसे तिळ कठीण असतो , पण गुळात मिसळला की स्वाद देतो , तसेच जीवनातील कठीण प्रसंग संस्कारांच्या गुळात मिसळले , तर जीवन मधुर होते . म्हणूनच संक्रांत म्हणजे केवळ सूर्याचा प्रवास नाही , तर माणसाचा आत्मप्रवास आहे . अंधारातून प्रकाशाकडे , निराशेतून आशेकडे , विखारातून संस्काराकडे नेणारी ही वाटचाल म्हणजेच संक्रांत आणि हेच उत्तरायण आहे .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**  
**तहसीलदार बीड**

◆ पान १ वरून पुढे...

## त्यांना मतदान...

आले आहेत. म्हणजे याचे शत्रू कोण तर आम्हीच ना, गोरगरीब जनता? आपल्या पक्षाचा नेता निवडून आला पाहिजे मग युती कुणासोबतही करा असा या लोकांचा अजेंडा आहे. लोक येडे आहेत, यांना पर्याय नाहीत. लोकांना एखादा पर्याय मिळू द्या, मग बघा जनता यांना कसं उलटंपालटं करते असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा स्थानिक लेव्हलच्या निवडणुकीत मी पडतच नाही, आपल्याला असा टप्पू मासा लागतो, त्याला जर माज असेल तर तो माज मी उतरवलाच म्हणून समजा असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## डिजिटल शिक्षणाचा...

प्रशासनाने उच्चारावा का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

डिजिटल शिक्षणाचा गाजावाजा करणाऱ्या शासन-प्रशासनाला पारधी समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल, तर सर्वप्रथम मुलभूत सुविधा तरी द्यायला हव्यात, इतकी साधी जबाबदारीही पार पाडण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे वास्तव या शाळेत स्पष्टपणे दिसून येत आहे. पारधी वस्तीतील मुलांच्या शिक्षणाची होणारी उपेक्षा हा अत्यंत गंभीर सामाजिक प्रश्न आहे. गरीबी, ऊसतोडीसाठी होणारे स्थलांतर आणि समाजाकडून पाहिले जाणारे दुर्लक्ष यामुळे आधीच अनेक मुलं शाळाबाह्य आहेत. अशा परिस्थितीतही शासन केवळ जाहिरातींमध्ये डिजिटल शिक्षणाचा गवगवा करत असेल, तर प्रत्यक्षात फळ्याविना, बाकाविना शिकणाऱ्या पारधी समाजातील मुलांसाठी शासनाला लाज वाटत नाही का? असा थेट सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## कायद्याची घडी...

जात आहे. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेची घडी बसवली आहे. किती आरोपींना तडीपार केलं, किती आरोपीवर मकोका लावण्यात आला. याची आकडेवारी मांडत स्तूतीचा ढोल पोलीस अधीक्षकांकडून वाजवण्यात आला.पण त्यात तथ्य असलं तरी सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवण किती अवघड आहे याच्या एक एक सुरस कहाण्या नेकनूर पोलीस ठाण्याच्या बाबतीत बाहेर येऊ लागल्या आहेत. अवैध धंद्यांना गोसावींच मिळालेले संरक्षण, गावोगाव दारू विक्रीला गोसावींनी दिलेली संमती, त्यातून बरबादी च्या वाटेवर असलेली तरुणाई, अवैध वसुली,चोऱ्या,दरोडे, किरकोळ गुन्हे हे एक वेळेला मान्य पण पोटची लेक गेल्या सव्वा महिन्यापासून गायब असताना तपासाच्या नावाखाली त्या

◆ पान १ वरून पुढे...

आई-वडिलांना मूर्खात काढत तपासात चाल ढकल करून गोसावींनी पैशापुढे माणुसकी महत्त्वाची नसल्याचं सप्रमाण सिद्ध केलं. सव्वा महिन्यापासून धावज्याची वाडी येथील अल्पवयीन मुलगी गायब झाली. आई-वडिलांनी नातेवाईकांकडे इतरत्र शोध घेतला. पण ती सापडली नाही. हातबल झालेल्या आई-वडिलांनी नेकनूर पोलिसात धाव घेतली. रीतसर तक्रार दाखल केली.मुलगी कोणी पळवली असेल याबद्दल संशयित लोकांची नावं देखील नेकनूर पोलिसांना दिली.यानंतर आम्ही तपास करत आहोत. लवकरच मुलीचा शोध घेऊ असे पोलिसांकडून सांगण्यात येत होते याबद्दल मुलीचे नातेवाईक दररोज पोलीस स्टेशनला येऊन न्यायासाठी रडगाणं गात होते. मुलीचा शोध लावा आमची मुलगी आम्हाला मिळवून द्या असं म्हणून टाहो फोडत होती. पण मिळणारी वर कमाईच्या खणखनाटापुढे चंद्रकांत गोसावी ला त्या आई-वडिलांच्या जीवाची होणारी तगमग त्यातून निघणारा हुंकार ऐकू गेलाच नाही. येणाऱ्या प्रत्येक दिवशी नेकनूर पोलिसांकडून एकच उत्तर ऐकावयास मिळत होते ते म्हणजे उद्यापर्यंत आपल्याला काहीतरी सुगावा लागेल त्याचबरोबर मोबाईलचे सी.डी.आर. काढत आहोत, आणखी त्यांच्या संपर्कात आलेल्यांची आम्ही चौकशी करत आहोत असे उत्तर गेल्या सव्वा महिन्यापासून ऐकावयास मिळत आहेत परंतु मुलीचा शोध लागत नसल्याने मुलीच्या आईने काही दिवस अन्न पाणी ही वर्ज्य केले होते परंतु तिची खालावत चाललेली तब्येत पाहून नातेवाईकांनी तिला अन्नपाणी घेण्यासाठी आग्रह केला.परंतु तरीही मुलीचा शोध लागत नसल्याने व त्या मुलीच्या आईची तब्येत खालावत असल्याने एक दिवस मुलीच्या आई-वडिलांसह इतर नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. पुन्हा तेच आश्वासन देऊन वेळप्रसंगी दाप दडप करून आई-वडील व नातेवाईकांना परत पाठवण्यात आले.त्या मुलीचा शोध का लागत नाही? मुलीच्या आई-वडिलांनी ज्यांच्याबद्दल संशय व्यक्त केला आहे त्या लोकांना पोलीस स्टेशनला आणून त्यांच्याकडून का चौकशी केली जात नाही? मग मुलीचा शोधच लागत नाही, की नेकनूर पोलिसांनाच शोध लावायचा नाही याबाबत मात्र मुलीचे आई-वडील व नातेवाईकांमधून नेकनूर पोलिसांच्या प्रामाणिकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. एस पी साहेब तुमचा प्रामाणिक कारभार आहे यात शंका घेण्याचं कोणतं कारण नाही. पण चंद्रकांत गोसावीं तुम्ही एवढा लाडावून ठेवण्याचं कारण काय? माध्यमांनी बातम्या छापूनही गोसावी वर कारवाई आजपर्यंत का झाली नाही? जनतेला न्याय मिळाला काय नाही मिळाला काय याच्याशी तुम्हाला देणं घेणं नव्हतं काय? ही जबाबदारी तुमची नाही काय? गायब झालेल्या मुलीच्या आई-वडिलांना न्याय मिळणार कसा? नेकनूर पोलीस ठाणं म्हणजे गुन्हेगारांचं अभय केंद्र नाही किमान एवढ्या तरी कान पिचक्या का दिल्या नाहीत? एकीकडे नेकनूर पोलीस ठाण्यात गोसावींनी इतकी बेबंदशाही माजवलेली असताना मग कायद्याची घडी बसवल्याचे ढोल का वाजवण्यात आले? अन् गोसावी ला मोकळ कुरण

◆ पान १ वरून पुढे...

का सोडण्यात आले?यासारखे अनेक प्रश्न नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील जनतेकडून विचारले जात आहेत.

## नक्कल करता....

दिले.पुन्हा एकदा मुंबई महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी आपण एकत्र आलो आहे. ही मुंबई कोणाचा बाप आला तरी महाराष्ट्रापासून तूटू शकत नाही. असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भाषणाची सुरुवात केली. आज तुम्हाला मराठी माणसावर संकट आले आहे असे वाटते. पण, गेली ३० वर्ष तुम्ही काय केले? मला आव्हान देतात की आदित्य ठाकरे यांच्याशी चर्चा करा. तुम्हाला मुलाची जाहिरात करायची आहे, ते ठीक आहे. आदित्य ठाकरेंशी चर्चा करायची असेल तर आमची उमेदवार शीतल गंभीर देखील पुरेशी आहे. आज मी खुले आव्हान देतो की, उद्या दिवसभरात कधीही आदित्य ठाकरे येउदेत. आमच्या शीतल गंभीर येतील. मग करूया चर्चा, असे खुले आव्हान त्यांनी यावेळी आदित्य ठाकरेंना दिले. मराठी माणसाच्या अस्तित्वाची लढाई नव्हे, तर तुमचे अस्तित्व पणाला लागले आहे. तुम्ही म्हणजे नव्हे, तुम्ही म्हणजे मुंबई नाही. महाराष्ट्राकडे कोणी वाकडी नजर करून पाहू शकत नाही. काही लोकांनी माझी नक्कल केली. नक्कल करता करता काकाच्या पक्षाची काय स्थिती झाली? हे त्यांना समजायला हवे. ते म्हणाले हिंदी सक्ती झाली म्हणून आम्ही एकत्र आलो. मुळातच या महायुतीच्या सरकारमध्ये महाराष्ट्रात फक्त मराठीच सक्तीचीच आहे. असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## संयमाने वाहन ....

या पुरस्काराने विविध क्षेत्रात गौरवपूर्ण कामगिरी केलेल्या युवकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, महामार्ग पोलीस अधीक्षक रुपाली दरेकर, पोलीस उपायुक्त वाहतुक शर्मिष्ठा घारगे वालावलकर, सुभाष भुजंग, राजकुमार कुमठाळे, गणेश विघ्ने, शशिकांत जोगे आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड. भगवान सदावर्ते- बाल शिक्षण, अर्णव महर्षि- विज्ञान तंत्रज्ञान, स्वाती पाटील- सहा. यांत्रिक अभियंता, दर्शन घोरपडे- आयर्न मॅन, तनिषा बोरामणीकर- बुद्धीबळ खेळाडू, डॉ. कविता जाधव- वैद्यकीय अधिकारी, कृष्णा मोहकरे- मोटार वाहन निरीक्षक, सचिन पाटील, प्रमोद गरड- पोलीस हेड कॉन्स्टेबल, आरती राठोड- सहा. अभियंता, पायल नाईकवड- मुख्य कार्यकारी अधिकारी रेयॉन इल्युमनेशन आणि एनर्जी सोल्युशन्स अशा विविध क्षेत्रातील युवकांना गौरविण्यात आले. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे व महामार्ग पोलीस अधीक्षक रुपाली दरेकर यांनी उपस्थित विद्यार्थी युवक युवतींना रस्ता सुरक्षा व नियम पालनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या

◆ पान १ वरून पुढे...

प्रारंभी राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांचे प्रतिपूजन करण्यात आले. विश्वा राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## गोदाकाठचा वाघ...

ब-बाबुराव चांदेरे,क-पार्वती निम्हण आणि ड-अमोल बालवडकर यांच्या प्रचारार्थ पुण्यातील पाषाण बालाजी चौकातील ज्ञानदीप मंगल कार्यालयात विजयी संकल्प सभेनिमित्त आ.विजयसिंह पंडित यांनी थेट मतदारांशी संवाद साधला. दिड लाखाहून अधिक मतदान असलेल्या या प्रभागात मराठवाड्यातील बहुतांश कुटूंब वास्तव्यास आहेत. साधारणत: १९९० च्या आसपास या भागात स्थायीक झालेले हे कुटूंब आज प्रगती साधत आहेत. त्याचं एकमेव कारण म्हणजे अजितदादांचे दुरदृष्टी नेतृत्व. दादांचा आश्वासक चेहरा, कामाचा उरक, राज्याच्या तिजोरीची हातात असलेली चावी आणि पालकमंत्री पदाच्या माध्यमातून असलेली सहज उपलब्धता या सर्व बाबी लक्षात घेऊन येणार्या दि.१५ जानेवारीला पुणे महानगर पालिकेत घड्याचा गजर करावा आणि सर्व उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी मतदारांना केले. या प्रसंगी माजी आ.राहुल मोटे, विजय भांबळे, अतुल बेनके, परभणी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अजय चौधरी, पुणे जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सुनिल चांदेरे, बीडचे माजी नगराध्यक्ष दिलीप गोरे, आबासाहेब सुतार, बालम सुतार, शिवम सुतार, राहुल बालवडकर, वैशाली कामजकर, मनोज बालवडकर, अजय निम्हण, संतोष तोंडे, नितीन चांदेरे, गणेश सुतार, सुखदेव चांदेरे, अर्जुन शिंदे, जितेंद्र कोळेकर, पांडुरंग आवारे पाटील आदिंसह मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धनंजय मुंडे...

नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील केले जाईल, असे वक्तव्य श्री पटेल यांनी केले आहे. विशेष म्हणजे चार दिवसांपूर्वी प्रफुल्ल पटेल यांनी एका दुसऱ्या वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देखील असेच वक्तव्य केले होते, त्यानंतर आज एका राष्ट्रीय वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्पष्ट वक्तव्य केले आहे. दरम्यान कुठल्याही चौकशीत धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नसून ते लवकरच मंत्री म्हणून काम करताना दिसतील असे स्पष्ट करत प्रफुल्ल पटेल यांनी सुसंकेत दिले आहेत! काही दिवसांपूर्वीच धनंजय मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेतल्याने या चर्चांना सुरुवात झाली होती. नुकतेच बीड येथील एका कार्यक्रमानंतर धनंजय मुंडे आपला पुढील दौरा अचानक रद्द करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत हेलिकॉप्टर मधून गेले, त्यामुळेही राज्यातील राजकारणात मोठी चर्चा झाली होती. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला असल्याचे दिसून येते.

◆ पान ४ वरून पुढे...

## बोरगावमध्ये विविध....

बाबासाहेब जाधव, गुलमेश्वर ग्रोचे चेअरमन पवन चव्हाण, सरपंच अंगद खरात, सरपंच विलास वाघमोडे, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी सुभाष बापू बोर्डे, सरपंच विश्वंभर सोनवणे, चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी बळीराम खराद, विश्वंभर गोरडे, देविदास खराद, प्रल्हाद खराद, मदन बापू गोरडे, आत्माराम गवारे, बदाम गोरडे, दिगंबर गंगाधर, चंदू जाधव यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी वर्ग व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात अडीच वर्षांची चिमुकली कुमारी यशस्वी राहुल जाधव हिने केलेल्या सुंदर व आत्मविश्वासपूर्ण भाषणाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या विकासकामांसाठी राहुल जाधव, माजी सरपंच संदीप जाधव व अशोक जाधव यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी विविध विकासात्मक मागण्या मांडल्या असता, सन्माननीय साहेबांनी त्याबाबत सकारात्मक भूमिका घेत योग्य तो निर्णय लवकरच घेण्याचे आश्वासन दिले.

## सोयाबीन, कापूस....

नफा कमावतात, मात्र शेतकऱ्याला केवळ सुमारे ७ हजार रुपयेच दिले जातात, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच एका क्विंटल सोयाबीनपासून ७०० ते ८०० लिटर सोया दूध तयार होते. ऑनलाईन विक्री संकेतस्थळांवर सोया दुधाचा दर प्रतिलिटर सुमारे १२० रुपये असल्याने व्यापारी एका क्विंटल सोयाबीनमागे ७५ ते ८५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवतात, मात्र शेतकऱ्याला अत्यल्प दर दिला जातो, याबाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृतीनंतर शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना भाववाढ केल्याशिवाय कापूस न देण्याचा निर्णय घेतला, तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवर माल देणे तात्पुरते थांबवले. परिणामी बाजारात कापूस व सोयाबीनचा तुटवडा निर्माण झाला. शेतमाल उपलब्ध होत नसल्याने व्यापाऱ्यांना अखेर कापूस व सोयाबीनचे दर वाढवावे लागले. शेतकरी पुत्रांच्या लढतीमध्ये शासनाने कापूस आयातीवर व्यापाऱ्यांना कर सूट थांबल्यामुळे फायदा झाला आहे हा यशस्वी लढा शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या एकजुटीचा असल्याचे राजेंद्र आमटे यांनी सांगितले. या आंदोलनास माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, कुलदीप करपे, सुहास जायभाय, राजू गायके, बाळासाहेब मोरे पाटील, गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, दिनेश गुळवे, धनंजय मुळे, नयना भाकरे, हिराबाई कांबळे, अंकुश सातपुते, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, गणेश मस्के, संगमेश्वर आंधळकर, भास्कर खंडे, रामधन जमाले, दत्ता प्रभाळे,

◆ पान ४ वरून पुढे...

खाजाभाई पठाण, राहुल साळुंके, संतोष शिंदे, श्रीराम कोरडे, श्रीकांत गदळे, सुरेश गरड, अप्पा डाके, आप्पासाहेब महानोर, हनुमान घोडके आदींचा सक्रिय पाठिंबा लाभला.

## महाजनवाडी – बीड ...

जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ड. सर्जेराव तांदळे, मा. नवनाथ अण्णा शिराळे यांच्या उपस्थितीत या रथयात्रेचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मीराताई गांधले, रामदास बडे, सुंदर चव्हाण, मनोज काका पाटील, भूषण पवार, प्रमोद रामदासी, संग्राम बांगर, प्रमोद पुसरेकर, प्रीतताई कुकडेजा, कृष्णा तिडके, महादेव नागरगोजे, मनोज काका बांडे, घोलप मामा, भालचंद्र कुलकर्णी, राजेश चरखा यांच्यासह पदाधिकारी व श्रीराम भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा रथयात्रा सोहळा महाजनवाडी – बीड – पैठण – छत्रपती संभाजीनगर – श्रीक्षेत्र घृष्णेश्वर – बुलढाणा – श्री क्षेत्र शेगाव – अकोला– अमरावती– नागपूर– रामटेक – जबलपूर– मैहर– चित्रकूट – श्रीक्षेत्र प्रयाग्रज – श्रीक्षेत्र वाराणसी – श्रीक्षेत्र काशी – आणि अयोध्याधाम असा प्रवासाचा मार्ग असणार आहे.. हा प्रवास ७५ दिवस असून २००० की. मीटरचा आहे.

## सहा तास आंदोलक...

पासून दहा की मी वर मंजरथ हे तीर्थ क्षेत्र आहे या ठिकाणी अंत्यसंस्कार नंतरची राख (रक्षा)विसर्जन करण्याची हिंदु धर्मात परंपरा आहे त्या राखेचे ग्रामपंचायत कार्यालय गोदावरी नदी येथे पात्रातील दशविधी (रक्षा) लिलाव काढले आहे. या लिलावामुळे गावातील व पारंपारिक वडिलोपार्जित काम करणाऱ्या लोकांवर उपासमारीची वेळ येत आहे. यामुळे मंजरथ गावची संस्कृती व परंपरा मोडीस येत आहे, याने लोकांची श्रद्धा भावना दुखावल्या जात आहेत व ग्रामस्थ पारंपारिक रक्षा चालून उपजिविका भागवणाऱ्या लोकांची उपासमार होत आहे. त्यामुळे हा जुलमी व बेकायदेशीर लिलाव तात्काळ रद्द करावा या साठी दि १२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मंजरथ येथील गोदावरी नदी पात्रात भीमाराव कदम,रामनाथ चुंबळे,अनिल चुंबळे ,अर्जुन जाधव, इसाक बेग ,महानंदा कचरे ,करुणा चौरे ,अरुणा शिंदे ,छाया टाकणखार सह लहान मुलं ,वृद्ध महिला व नागरी जलसमाधी घेण्यासाठी नदीपात्रात उतरले होते दरम्यान हे राख तात्काळ रद्द करावे असा ठाम पवित्रा घेत प्रशासनाला धारेवर धरले होते शेवटी ग्रामपंचायत कार्यालय नमले आणि त्यांनी त्यांच्या त्या निर्णयाला लेखी स्थगिती दिल्याने सुमारे सहा तास चाललेले हे जलसमाधी आंदोलन मागे

◆ पान ४ वरून पुढे...

घेण्यात आले. या वेळी ग्रामीण पोलिस स्टेशन चे पो नी बालक कोळी ,ए पी आय गोविंदा पांडव, गट विकास अधिकारी ज्योत्सना मुळीक ,विस्तार अधिकारी महेंद्र गायकवाड तलाठी भारत भटे व ग्रामसेवक खेत्रे आदी प्रशासकीय अधिकारी यांच्या सह आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे अशोक ढगे आदी ची उपस्थिती होती आंदोलन ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त ,अग्निशमन दल व वैद्यकीय सेवा तैनात करण्यात आली होती

## रहेमान सय्यद यांना....

दिसून येतात पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रकरणाचे वाचा फोडणारे रहेमान सय्यद यांनी गोरगरिबांना योजनेत सहकार्य करणे,मतदार यादीत नावे नोंदणी करणे अशी अनेक समाजोपयोगी कार्य करत अन्याया विरोधात कायम आंदोलने उपोषणांसह लेखनीतून आवाज उठवून अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या कामांची दखल घेत त्यांना दै.अल्हिलाल समूहाच्या वतीने येत्या ३१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित भव्य दिव्य पुरस्कार सोहळ्यात त्यांना नजाबत अली उस्मानी आदर्श व्यक्तिमत्व पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल रहेमान सय्यद यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## लोणीघाट येथे...

बैठकीच्या प्रारंभी स्वराज्यप्रेरिका राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी लोणीघाट जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. शासन आपल्या दारी या संकल्पनेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत महसूल प्रशासनाने थेट गावपातळीवर उपस्थित राहून शेतकरी व नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. हनुमान मंदिर सभागृहात झालेल्या या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले. बैठकीदरम्यान महसूल दाखले, फेरफार, वारसा हक्क, जमीन नोंदी, शेतीविषयक अडचणी, पीकविमा, ॲग्रीस्टॅक तसेच विविध शासकीय योजनांबाबत नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गावातील रस्त्यांबाबतची प्रकरणे तसेच बळीराजा शेतकरी सन्मान योजनेसंदर्भातील मुद्द्यांवर तहसीलदारांनी नियमांनुसार तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन दिले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार तसेच छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन अधिक गतिमान व नागरिकाभिमुख पद्धतीने कार्यरत

◆ पान ४ वरून पुढे...

असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले. या वेळी शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत विविध प्रमाणपत्रे, महसूल दाखले, श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र, कुणबी व डोमिसाईल प्रमाणपत्रे तसेच फार्मर आयडीचे वितरण करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना तालुका अथवा जिल्हा मुख्यालयात जाण्याची आवश्यकता भासली नाही. या बैठकीस लिंबागणेश मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, ग्राम महसूल अधिकारी गणपत पोतदार, नारायण दराडे, विपुल बनकर, शेख गफूर, अक्षय शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी नितेश माळी, एस. डी. गायकवाड, एच. एन. दहे, सहाय्यक कृषी अधिकारी सचिन भालशंकर व आगलावे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा, सरपंच प्रतिक्षा जाधव, उपसरपंच सुमन जाधव, ग्रामपंचायत सदस्य मैनाबाई सातपुते, आशाबाई जाधव,राम जय जाधव, त्रिंबक जाधव, विनायक जाधव , बाबासाहेब जाधव, उत्तरेश्वर जाधव, बाबुराव जाधव, सुरेश मिटकरी , जयसिंग जाधव, तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल प्रशासन थेट गावात येऊन नागरिकांच्या समस्या ऐकत असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. अशा आढावा बैठकींमुळे प्रशासन व नागरिकांमधील संवाद अधिक बळकट होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## सौ.सुनंदा...

करण्यात आले. या वेळी बीड आणि मुर्शिदपूर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते कार्यकर्ते यांच्यासह डॉक्टर, इंजिनीयर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे.जगताप परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक_ परिवार सहभागी आहे.

## भल्या पहाटे...

यांनी बीड तालुक्यात कुठेही अवैधरित्या वाळू वाहतूक खपवून घेतली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे . या कारवाईत पारगाव सिरस विभागाच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप व दादासाहेब शेळके तसेच महसूल सहायक भरत भंडाणे यांनी सक्रिय सहभाग घेतला . महसूल प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून , पुढील काळातही अशा प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी राजमाता जिजाऊ यांची जयंती जल्लोषात साजरी



स्वराज्य प्रेरिका, राजमाता जिजाऊ माँसाहेबांची जयंती. निम्मित अभिवादन करतांना सामाजिक कार्यकर्ते श्री. हरिभाऊ शेळके, प्रवीण शेळके पाटील या पवित्र दिनी त्यांच्या स्मारकाला व पावन स्मृतींना अभिवादन करताना.



स्वराज्य जननी, स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील जिजाऊ उद्यान येथे तुम्ही आम्ही बीडकर आयोजित जिजाऊ वंदनेस उपस्थित राहून अभिवादन करताना द्वारकाधीश मित्र मंडळ नगरसेवक जगदीश भैय्या गुरखुदे, परशुराम भैय्या गुरखुदे आदी छायाचित्रात दिसत आहेत.



शिवसंग्राम स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंती निमित्त शिवसंग्राम भवन बीड येथे अभिवादन करण्यात आले . याप्रसंगी उपस्थित शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे, मराठवाडा प्रमुख अनिल भाऊ घुमरे , शहराध्यक्ष सुहास आबा पाटील , कैलासजी शेजाळ , गणेशजी धोंडरे, गहिनीनाथ मस्के तसेच शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



राजमाताजिजाऊमाता यांच्या ४२९ व्या जयंतीनिमित्त राजीव गांधी उद्यान येथे अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम,पंकज कुटे, सतीशसिंह परदेशी, रवि भोस्कर, नवनाथ प्रभाळे, अनिल माने, प्रदीप कोटुळे, संदीप उबाळे, नाना पवार, राजू हुरकुडे, रंगनाथ पैठणकर तसेच इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेवराई नगरपरिषद येथे राजमाता माँसाहेब जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगराध्यक्षा सौ.गीताभाभी त्रिंबक उर्फ बाळराजे दादा पवार साहेब यांच्या शुभहस्ते प्रतिमेचे पूजन करून राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली, त्यावेळी यादरम्यान नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा,उपनगराध्यक्षा, सिओ,सर्व नगरसेवक,कर्मचारी आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वराज्य निर्माण कर्त्या राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती संयुक्त रित्या साजरी करण्यात आली या वेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करतांना तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. दहीफळे सर, डॉ.नितिन काकड सर, लोढे सिस्टर, धनवे सिस्टर, विशाखा मॅडम, महेश मरकड, आरोग्य सहाय्यक केदार आण्णा, वाहन चालक एकनाथ नाटकर, गफार भाई पठाण, आरोग्य सेवक खटके, मिटकर मावशी व समस्त आरोग्य कर्मचारी

## राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील जिजाऊ उद्यान येथे 'तुम्ही आम्ही बीडकर' यांच्यावतीने जिजाऊ वंदन कार्यक्रमाचे सोमवारी आयोजन केले होते. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी उपस्थित राहून माँ जिजाऊ यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.






यावेळी बीड नगरपालिकेच्या भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धुत, ड.नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, नितिन साखरे, सनी माने, राहुल गुरखुदे, राकेश जाधव, मुन्ना गायकवाड, अजिंक्य शिराळे, परसराम जाधव, रोहन गायकवाड, विक्की पाचांग्रे, गोरख काळे, दत्ता गायकवाड, साहस आदोडे, बाबुलाल ढोरमारे, माणिक वाघमारे, अशोक वाघमारे, बाळासाहेब घोडके, शुभम कातांगळे, विठ्ठल गुजर, गणेश जगताप, ज्ञानेश्वर राऊत, डॉ. रमेश शिंदे, धनंजय वाघमारे, विशाल राऊत, मंगेश सानप, विक्रम चव्हाण, राजेश चरखा, अमर विद्यागर, विशाल मोरे, घोडके यांच्यासह जिजाऊ प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात जिजाऊंच्या जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## शांताई अर्बनमध्ये जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

समाजप्रबोधन व राष्ट्रनिर्मितीचे विचार रुजवणाऱ्या राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., बीड येथे उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे गणेश चव्हाण व योगेश शिंदे यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे यांनी स्वामी



विवेकानंद यांच्या विचारांवर सखोल मार्गदर्शन करताना, स्वतः वर विश्वास ठेवून प्रामाणिकपणे कार्य केल्यास कोणतेही ध्येय साध्य होऊ शकते. विवेकानंदांचे विचार आचरणात आणल्यास व्यक्ती व संस्था दोन्ही प्रगती करू शकतात, असे प्रतिपादन केले. यावेळी बँकेच्या कार्यपद्धती, विश्वासार्हता व समाजाभिमुख वाटचालीबाबत बँकेचे वर्णन करण्यात आले. तसेच संदीप वाघमारे सर यांनीही उपस्थितांना स्वतःच्या अनुभवातून मार्गदर्शन व प्रेरणादायी उपदेश केला. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना सकारात्मक दृष्टीकोन मिळाला. यानंतर प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. सर्व उपस्थितांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, खातेदार, पिग्मी एजंट व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून राष्ट्रप्रेम, आत्मविश्वास व सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.



माजलगाव लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुदंरनगर चे कार्यालयात आज स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड,समवेत बळीराम निपटे,नानासाहेब वाघचौरे,बालाजी सुरवसे,महादेव मुरकुटे,नागोराव निर्मळ,ज्ञानेश्वर ठोंबरे,अंकुश देशमुख,बाशिंबे मामा

## माँसाहेब राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जन्मोत्सव

**गेवराई । प्रतिनिधी**

पौळाची वाडी,गेवराई भाजपा गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते माननीय बाळराजे दादा पवार साहेब यांनी पौळाची वाडी येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे



विचार प्रवर्त करून अमलात आणून मार्गदर्शन केले,यावेळी अध्यक्ष म्हणून इन फ्रंट ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री.दत्ता(मामा) बारगजे (आनंदग्राम बीड.),संध्या मामी बारगजे, इतर मान्यवर व शालेय विद्यार्थी आणि पौळाची वाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

शहरा पासून जवळ असलेल्या शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दत्तात्रय चव्हाण



सर होते. व्यासपीठावर श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्री गुजर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कु. श्रेया कदम हिने केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जि. प. माध्यमिक शाळा तलवाडा येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**तलवाडा । प्रतिनिधी**

जि. प. माध्यमिक शाळा, तलवाडा येथे राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती तातुडे मॅम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक श्री. विजय डोंगरे उपस्थित होते. तसेच माजी मु. अ. पी. श्री. बी. जाधव (सिनिअर) व पर्यवेक्षक श्री. जायभाये सर यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. प्रास्तविक श्री हातमोडे सर यांनी केले .विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत सहभाग घेतला होता, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली. विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी श्री. पी. बी. जाधव सर (ज्युनिअर) व श्री. खेडकर सर यांनी प्रेरणादायी विचार मांडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. खेत्रे सर (चेअरमन, शिक्षक पतसंस्था, गेवराई) तसेच सर्व शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कु. रागिनी व कु. अक्षरा यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. कवरे सर यांनी आभार प्रदर्शन करून सर्व मान्यवरांचे, शिक्षकांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




## निवासी मतिमंद विद्यालय,वासनवाडीफाटा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

### नशामुक्तीची शपथ आणि दिव्यांग गुणवंत खेळाडूंचा गौरव ; जिल्हास्तरीय स्पर्धेतील यशाचे कौतुक

**बीड । प्रतिनिधी**

विश्वध्रुप फाउंडेशन बीड संचलित, निवासी मतिमंद विद्यालय वासनवाडी फाटा येथे राजमाता जिजाऊ यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमातून केवळ थोर व्यक्तींच्या विचारांचे स्मरणच करण्यात आले नाही, तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सामाजिक जाणीवेलाही उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सामाजिक बांधिलकी



जपणाऱ्या एका महत्त्वाच्या उपक्रमाने झाली. नशामुक्त अभियान अंतर्गत शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी अंमली पदार्थ विरोधी नशामुक्तीची शपथ घेतली. व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.खेळाडूंचा आणि कलावंतांचा सन्मान याच कार्यक्रमाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत देदिप्यमान यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला:कु. नेहा शहादेव वाणी हिने जिल्हास्तरीय गोळाफेक स्पर्धेत मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. दिव्यांग महोत्सवात आपल्या अभिनयाने सर्वांची मने जिंकणाऱ्या मोमीन फुरखान, गोपाळ भुबे,अर्शल शेख, मयुरेश शिंदे, नेहा वाणी आणि यश धुमाळ या विद्यार्थ्यांचेही शाळा प्रशासनाकडून कौतुक करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे प्रशिक्षक आणि शिक्षकांचे मोठे परिश्रम आहेत. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि दिव्यांग महोत्सवासाठी विशेष परिश्रम घेणारे क्रीडा शिक्षक श्री.डोंगरे सर आणि विशेष शिक्षक श्री.आबूज सर यांचा सन्मान शाळेचे मुख्याध्यापक श्री.शिंदे सर यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वामी विवेकानंद आणि जिजाऊंच्या विचारांतून प्रेरणा घेत या मुलांच्या आयुष्यात जिद्द निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक **मराठवाडा पत्र**

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६ • पान ४

## थोडक्यात...

### महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ या अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजनाबाबत

**बीड । प्रतिनिधी**

राज्यासाठी महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या चडचए क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार, स्वयंरोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम व निर्यातवृद्धीस चालना देण्यासाठी तसेच उद्योगाच्या विकासाकरीता राज्य तसेच केंद्र शासनाचे विविध विभाग त्यांचे उपक्रम व योजना संचालनालया मार्फत राज्यात राबवत आहेत. सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपिठावर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व विभागांच्या सहकार्याने महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ या अंतर्गत बीड जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.१३.०१.२०२६ रोजी हॉटेल अन्विता, जालना रोड, बीड येथे सकाळी १०.०० ते ०४.०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे, तरी सदर कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व उद्योजकांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी केले आहे.


### पदवीधर मतदारसंघ यादी प्रकाशित जिल्ह्यात ५४२०६ एकूण मतदार

**बीड । प्रतिनिधी**

१ नोव्हेंबर २०२५ अर्हता दिनांक निश्चित करून तयार करण्यात आलेला ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीचे अंतिम प्रकाशन आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मनोज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या यादीमध्ये मसुद्यानुसार ४७१७४ मतदार होते. यात नव्याने ७७१६ नावे वाढविण्यासाठी मतदारांनी अर्ज सादर केले. छाननीनंतर यापैकी ४३६ जणांचे अर्ज अस्विकृत ठरले त्यामुळे ७२८० नावे यादीत सामील करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यादीतील नावांबाबत ११ आक्षेप दाखल झाले ते सर्व स्विकारण्यात आले आहेत. यादीतून एकूण २४८ नावे वगळण्यात आली आहेत यानंतर अंतिमतः ७०३२ नावे वाढली असून यादीत आता जिल्हयातील मतदारांची एकूण संख्या ५४२०६ इतकी झाली आहे. यात ४२२८२ पुरुष तर ११९२२ महिला व २ इतर मतदार आहेत.

### आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगावात भव्य शिवकालीन शस्त्रप्रदर्शन

#### भेटवस्तूंऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य आणण्याचे आवाहन



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार आदरणीय प्रकाशदादा सुंदरराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव नगरीत प्रथमच भव्य स्वरूपात शिवकालीन ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, युद्धशस्त्रांचे दर्शन तसेच मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हिंदवी स्वराज्याचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि तरुण पिढीला शौर्य, शिस्त व संस्कारांची प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा वाल्मिकी अर्बन कोऑप्रेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिलभाऊ नखाते उपस्थित राहणार आहेत. सविस्तर वृत्त असे की, हा कार्यक्रम तुळजाभवानी मर्दानी खेळ, प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला असून शिवश्री रविंद्र भाऊसाहेब जगदाळे (इतिहास संशोधक व शस्त्र-अभ्यासक) यांच्या मार्गदर्शनाखाली शिवकालीन दुर्मिळ शस्त्रसंग्रहाचे सादरीकरण होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वात भव्य अशा ऐतिहासिक पारंपरिक शस्त्रांचे दर्शन नागरिकांना घेता येणार आहे. तलवारी, भाले, कट्यारी, ढाली, तोफगोळे, जुनी युद्धसामग्री यासह प्रत्यक्ष युद्ध कौशल्यांचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. कार्यक्रम दि. १३ व १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून इतिहासाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.या भव्य उपक्रमासोबतच आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक संदेश देणारा उपक्रमही राबविण्यात येत आहे. शुभेच्छा देताना शाल, श्रीफळ, हार, बुके यांसारख्या औपचारिक भेटवस्तूंऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक साहित्य व शाळांसाठी प्रथमोपचार किट भेट देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. यामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

### शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढीवर भर द्यावा : अमरसिंह पंडित

# बोरगावमध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण व दोन अंगणवाड्यांचे भूमिपूजन

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरगाव परिसराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमात २५ लाख रुपये ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण, प्रत्येकी १० लक्ष रुपयांच्या दोन अंगणवाड्यांचे भूमिपूजन, चौक सुशोभीकरण अंतर्गत १० लक्ष रुपयांच्या पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्याहस्ते करण्यात आला. या विकास कामांचा फायदा सर्वसामान्यांना होणार असून शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून एकरी उत्पादन वाढविण्यावर भर द्यावा असे प्रतिपादन यावेळी माजी




आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई तालुक्यातील बोरगाव येथील विविध विकास कामांचे लोकार्पण व भुमिपूजन कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, बोरगाव परिसरात दर्जेदार विकासकामे सुरू असून याचा थेट फायदा सर्वसामान्य जनतेला होणार आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून एकरी उत्पन्न वाढवण्यावर भर द्यावा. शासन व लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांनी ग्रामस्थांना संबोधित केले. यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदू काका गोरडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ▶▶ उर्वरित पान २ वर

## सोयाबीन, कापूस भाववाढ; शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश – राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापूस पिकाला रास्त भाव मिळावा, या मागणीसाठी शेतकरी पुत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला यश मिळाल्याने सोयाबीन व कापसाच्या दरात वाढ झाली असून, हा विजय शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्रांच्या एकजुटीचा असल्याचे प्रतिपादन शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केले. बीड येथील संत

### हा शेतकरी व शेतकरी पुत्रांच्या एकजुटीचा विजय



तुकाराम महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरू झालेला कापूस व सोयाबीन भाववाढ आंदोलन मिडीयाचा माध्यमातून महाराष्ट्राच्या विधिमंडळात व थेट शेतकऱ्यांना भाववाढ करण्यापर्यंत पोहचली आहे. कापूस व सोयाबीन दरवाढीसाठी बीड जिल्ह्यातील सुमारे ७० ते ८० गावांमध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाची माहिती शेतकऱ्यांसमोर मांडण्यात आली. एक क्विंटल कापसापासून ७०० ते ८०० मीटर कापड, ५० किलो सरकी पेंड तसेच ८ ते १० लिटर तेल तयार होते. या सर्व उत्पादनांतून व्यापारी एका क्विंटलमागे ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत ▶ उर्वरित पान २ वर



*बीड: ए.आर. माने यांच्या वाढदिवसानिमित्त औक्षण करून शुभेच्छा देताना सौ. नंदा माने छायाचित्रात दिसत आहेत.*

## महाजनवाडी – बीड ते अयोध्याधाम श्रीरामनाम रथयात्रा सोहळा प्रस्थान

#### भाजपा जिल्हा कार्यालयात भव्य स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक, श्रीराम भक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या संकल्पनेतून,श्रीरामनवमी निमित्त व देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी महाजनवाडी - बीड ते श्री. क्षेत्र



अयोध्याधाम नमो श्रीरामनाम रथयात्रा सोहळा काल बीड येथून प्रस्थान झाला. भाजपा जिल्हा कार्यालयात ▶ उर्वरित पान २ वर

## सहा तास आंदोलक लेकराबाळा सह नदी पात्रात लेखी आश्वासना नंतर आंदोलन मागे

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मंजरथ ग्रामपंचायत ने गोदावरी नदीपात्रात होणाऱ्या राख व्यवसायाचे सरपंच व ग्रामसेवकाने संगणमताने टेंडर काढले होते ते तात्काळ रद्द करावे या साठी काल सुमारे सहा तास आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेत लेकराबाळा सहित नदीपात्रात जलसमाधी घेण्यासाठी उतरले होते अखेर ग्रामपंचायत प्रशासन नमले असून सदरील टेंडरला स्थगिती दिले असल्याने हे जलसमाधी आंदोलन तूर्त मागे घेतले आहे. माजलगाव ▶▶ उर्वरित पान २ वर

#### मंजरथ येथील राख लिलाव प्रकरण



**सदरील आंदोलन मागे घेण्यासाठी येथील आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे यांनी प्रशासन व आंदोलक यांच्यात समेट घडवण्यासाठी महत्वाची भूमिका निभावली असल्याने संपूर्ण आंदोलन शांततेत पार पडले**

## रहेमान सय्यद यांना दै.अल्हिलाल समूहाचे नजाबत अली उस्मानी आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार जाहीर

**कडा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील एकमेव उर्दू दैनिक अल्हिलाल टाइम्स यांनी उर्दू वर्तमानपत्रासह मराठी वर्तमानपत्र दैनिक संघर्ष नावाने सुरू करून उर्दू दैनिकाचे समूह घडून आणण्याचे काम केले आहे. त्यांच्या वतीने गेल्या १८ वर्षांची परंपरा कायम ठेवत १९ व्या वर्षात हि भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले असून ३१ डिसेंबर २०२६ रोजी भव्यदिव्य



पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बीड येथील नामवंत शिक्षक समाजसेवक उर्दू प्रेमी नजाबत अली उस्मानी यांच्या नावाने दरवर्षी आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार प्रदान करण्यात येते. यंदाच्या या पुरस्कारासाठी आष्टी तालुक्यातील कडा येथील धडाडीचे समाजसेवक रहेमान सय्यद यांची निवड करण्यात आली आहे. कडा येथील रहिवाशी रहेमान सय्यद हे सामाजिक कार्यासह पत्रकारिता क्षेत्रात हि अग्रेसर असुन तालुक्यातील रूग्ण असो कि गोरगरीब त्यांच्या सेवेत ते नेहमी ▶▶ उर्वरित पान २ वर

## लोणीघाट येथे लिंबागणेश महसूल मंडळाची आढावा बैठक संपन्न

#### नागरिकांच्या प्रश्नांवर थेट चर्चा ; तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळ विभागातील लोणीघाट येथे मंडळस्तरीय महसूल आढावा बैठक उत्साहात पार पडली. ▶ उर्वरित पान २ वर




## सौ.सुनंदा राजेंद्र जगताप यांचे दु:खद निधन

**बीड । प्रतिनिधी**



तालुक्यातील मुर्शदपूर येथील मूळ रहिवासी व सध्या शिवाजी विद्यालया जवळील त्वरिता कॉलनी येथे वास्तव्यास असलेल्या सौ. सुनंदा राजेंद्र जगताप (वय ६८) यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्या श्री राजेंद्र संतराम जगताप यांच्या पत्नी तसेच श्री प्रवीण राजेंद्र जगताप यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्वरिता देवी कॉलनी व मुर्शदपूर परिसरात शोककळा पसरली. सौ. सुनंदा जगताप या अतिशय शांत, संयमी व धार्मिक वृत्तीच्या होत्या. साधू-संतांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता. सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सकारात्मक सहभाग राहिला. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मुर्शदपूर येथे अंत्यसंस्कार ▶ उर्वरित पान २ वर

# भल्या पहाटे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साक्षाळपिंपरीच्या नदीपात्रात

#### चोरट्या वाळू वाहतुकीवर महसूलची विभागाची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील साक्षाळपिंप्री येथे सिंदफना नदीपात्रातून अवैधरित्या सुरू असलेल्या वाळू वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने धडक कारवाई करत दोन ट्रॅक्टरवर कार्यवाही केली आहे . ही कारवाई १२ जानेवारी रोजी पारगाव सिरस महसूल मंडळाच्या हद्दीत साक्षाळपिंपरी येथे करण्यात आली .

पहिल्या घटनेत महसूल पथकाने अफसर शेख याचे ट्रॅक्टर अडवले असता त्यामध्ये सुमारे एक ब्रास वाळू विनापरवाना वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले . सदर वाळू सिंदफना नदीपात्रातून चोरट्या पद्धतीने उपसा



करून वाहतूक करण्यात येत होती . तहसीलदार शेळके यांच्यासह महसूल कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर थांबवून कागदपत्रांची मागणी केली असता कोणतेही वैध परवाने अथवा रॉयल्टी पावती सादर करण्यात आली नाही . कारवाईदरम्यान संबंधित आरोपी अफसर शेख याने महसूल कर्मचाऱ्यांची दिशाभूल करून ट्रॅक्टर घटनास्थळावरून पळवून नेले . याबाबत पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे . त्यानंतर लगेचच त्याच परिसरात दुसरे एक ट्रॅक्टर महसूल पथकाच्या निदर्शनास आले . सदर ट्रॅक्टर सुनील बेंद्रे यांचे असल्याचे निष्पन्न झाले . तपासणीदरम्यान या ट्रॅक्टरमधूनही अवैधरित्या वाळू वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले . या प्रकरणी महसूल पथकाने ट्रॅक्टर व ट्रॉली ताब्यात घेतली असून , चालक व मालकाविरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या सातत्यपूर्ण सूचनांनुसार गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर कठोर कारवाया करण्यात येत आहेत . बीड जिल्हाचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अवैध वाळू वाहतुकीवर शून्य सहनशीलतेचे धोरण राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्याकडून याबाबत नियमित आढावा घेतला जात असून , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचा मंडळाधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे सातत्याने तगादा असतो.

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या अवैध चोरट्या वाहतुकीविरोधात सक्रिय असून , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके ▶▶ उर्वरित पान २ वर